दिनांक :- ०९/०८/२०२४

# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.

## पोलीस भरती २०२२-२०२३
## वाहन चालक कौशल्य चाचणी वेळापत्रक

पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक पदाच्या वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीस पात्र ठरलेल्या एकूण ४०२५ उमेदवारांची वाहन चालक कौशल्य चाचणी दि.१३/०८/२०२४ पासून घेण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने दि.१३/०८/२०२४ ते १७/०८/२०२४ या कालावधीतील एकूण ११०० उमेदवारांच्या कौशल्य चाचणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. सदर वेळापत्रकामध्ये नमूद चेस्ट क्रमांकाचे उमेदवारांनी त्यांचे चेस्ट क्रमांकासमोरील दिनांकास **पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे** याठिकाणी सकाळी ०५.३० वा. वाहन चालक कौशल्य चाचणीकरिता बिनचूक उपस्थित रहावे.

| अ.क्र. | दिनांक व वेळ | चेस्ट क्र. | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | **१३/०८/२०२४ (मंगळवार) सकाळी ०५-३० वा.** | **०१ ते ८९१** | **२००** |
| २ | **१४/०८/२०२४ (बुधवार) सकाळी ०५-३० वा.** | **८९९ ते १९७६** | **३००** |
| | **१५/०८/२०२४ (गुरुवार)** | **स्वातंत्र्यदिन शासकीय सुट्टी** | |
| ३ | **१६/०८/२०२४ (शुक्रवार) सकाळी ०५-३० वा.** | **१९८१ ते ३१४२** | **३००** |
| ४ | **१७/०८/२०२४ (शनिवार) सकाळी ०५-३० वा.** | **३१४३ ते ४१६५** | **३००** |

**उमेदवारांकरिता सूचना –**

१. उमेदवारांनी वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीसाठी येताना मैदानी चाचणीकरिता महा-आयटीकडून देण्यात आलेल्या प्रवेशपत्राची प्रत, या कार्यालयाकडील ओळखपत्र, वाहन चालविण्याचा मूळ परवाना, आधार कार्ड किंवा पॅन कार्ड तसेच ०५ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावे. सदर कागदपत्रे न आणल्यास कौशल्या चाचणीकरिता प्रवेश दिला जाणार नाही.

२. वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी एकूण ५० गुणांची असून सदर चाचणी खालीलप्रमाणे ०२ प्रकारांमध्ये घेण्यात येईल.

**अ) हलके वाहन चालविण्याची चाचणी – २५ गुण.**

**ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी – २५ गुण.**



Scanned with OKEN Scanner

उमेदवारांना सदर चाचणीमध्ये ४०% गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जे उमेदवार ४०% गुण मिळवून उत्तीर्ण होतील, ते उमेदवार लेखी परीक्षेकरिता पात्र ठरतील. तसेच कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून सदर चाचणीमध्ये मिळालेले गुण हे गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणांमध्ये समाविष्ठ केले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. जे उमेदवार उपरोक्त नमूद वेळापत्रकानुसार त्यांना नेमून दिलेल्या तारखेस कौशल्य चाचणीकरिता उपस्थित राहणार नाहीत, अशा उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत तारीख बदलून मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

(रोहिदास पवार)
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय,
पुणे शहर.



Scanned with OKEN Scanner